दै. पुढारी १३ सप्टेंबर 2003

# कमला महाविद्यालयात उद्योजकता परिचय शिबिर

कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तीमत्त्व विकास विभाग आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच तीन दिवसाच्या कालावधीत उद्योजकता परिचय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्पाधिकारी प्रवीण कायंदे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‌घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. या शिबिरामध्ये आनंद कुलकर्णी यांनी वेळेचे व्यवस्थापन यासंदर्भात आपले विचार मांडले तर सौ. सविता जाधव व दिपाली इंगवले यांनी विद्यार्थिनी समोर वॉशिंग पावडर, मेणाची फुले, फिनेल, नीळ, भांड्याचा साबण तयार करण्याची प्रात्यक्षिके सादर केली.

प्रशांत मोरे यांनी विपणनाच्या विविध संधी या विषयावर मार्गदर्शन केले. प्रवीण कायंदे यांनी शासनाच्या विविध स्वयंरोजगारी योजना विद्यार्थिनीसमोर मांडल्या. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सौ. वर्षा मेंदर्गी, प्रा. सौ. ए. व्ही. पाठक यांनी केले.

दै. पुढारी
१३ सप्टेंबर 2003

## कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय पोषक आहार सप्ताह उत्साहात

कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय पोषक आहार सप्ताहानिमित्त गृहशास्त्र व योगा व स्वास्थ्य जागृती विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले. त्यामध्ये समतोल आहार विविध आजारांवरील आहार उपाययोजना व सदृढ आरोग्याकरिता आहार मार्गदर्शक तत्त्वे या विषयांचा समावेश होता; तसेच आहारविषयक निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पुष्पा कुरणे, द्वितीय क्रमांक कु. प्रियदर्शनी मोहिते तर तिसरा क्रमांक कु. सिंधु वायदंडे यांनी मिळवला. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले. संयोजन प्रा. [illegible]

दै. सकाळ
१३ सप्टेंबर 2003

## कमला महाविद्यालयात शिबिर

कोल्हापूर, ता. १२ : कमला महाविद्यालयात उद्योजकता परिचय शिबिराचे उद्‌घाटन उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्पाधिकारी प्रवीण कायंदे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास विभाग व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे शिबिर झाले. आनंद कुलकर्णी यांनी व्यावसायिक यश व सौ. सविता जाधव, दीपाली इंगवले यांनी वॉशिंग पावडर, मेणाची फुले, फिनेल, नीळ तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखविली. प्रशांत मोरे यांनी विपणनाच्या विविध संधी विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. सौ. वर्षा मैंदर्गी, प्रा. सौ. ए. व्ही. पाठक यांनी संयोजन केले.